**-: प्रेस नोट :-** दिनांक :- ०४/०४/२०२४

## बनावट कागदपत्रे तयार करून तोतया जामिनदार मा. न्यायालयांमध्ये हजर करून अटकेतील आरोपीतांना जामिन करून देणाऱ्या टोळीविरुध्द मुंबई गुन्हे शाखेने कारवाई केलेबाबत...

.................................................................................................

दिनांक ०३/०४/२०२४ रोजी मुंबई गुन्हे शाखा, कक्ष ६ कार्यालयास,''महात्मा फुले नगर, मानखुर्द, मुंबई या ठिकाणी काही इसम हे मुंबई, ठाणे, नवी मुंबई व इतर जिल्हयांमधील वेगवेगळया पोलीस ठाण्यांमध्ये दाखल गुन्हयांतील अटक आरोपींचे जामीनाकरीता लागणारे वेगवेगळया नावाचे जामीनदारांचे बनावट कागदपत्रे उदा. आधार कार्ड, वेतन स्लीप, बॅंक स्टेटमेंट, रेशन कार्ड इ. कागदपत्रे लॅपटॉपवर तयार करून यावर विविध शासकीय व खाजगी कार्यालयांचे बनावट रबरी स्टॅंप मारून तयार केलेल्या बनावट कागदपत्रांसह तोतया जामिनदारास मा. न्यायालयांमध्ये उभे करून अटकेतील आरोपीतांना जामिन करून देतात.'' अशी गोपनीय माहिती प्राप्त झाली होती.

सदर बातमीचा पाठपुरावा करून दिनांक ०३/०४/२०२४ रोजी मिळालेल्या गोपनीय बातमीची सर्वांगीण शहानिशा करून नियोजनपूर्व मुंबई गुन्हे शाखा, कक्ष ६ कार्यालयातील पोलीस पथकाने महात्मा फुले नगर, मानखुर्द, मुंबई या ठिकाणी छापा टाकून घटनास्थळावरून आरोपी नामे १) अमित नारायण गिजे, वय ४४ वर्षे, २) बंडु वामन कोरडे, ४४ वर्षे यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्यांनी दिलेल्या माहितीवरून लागलीच विविध पथके तयार करून नियोजनपूर्वक ३) अहमद कासिम शेख, ४४ वर्षे, यास छेडा नगर, मुंबई येथून तसेच ४) संजीव सोहनलाल गुप्ता, ३४ वर्षे, यास भिवंडी,जि. ठाणे येथून व ५) उमेश अर्जुन कावले, ४८ वर्षे यास कल्याण, जि.ठाणे येथून असे एकूण ५ आरोपींना ताब्यात घेवून त्यांचे ताब्यातून बनावट आधार कार्ड, रेशन कार्ड, वेगवेगळया कंपन्यांचे ओळखपत्रे, पॅनकार्ड, महानगर पालिकेच्या कर पावत्या, एक लॅपटॉप, एक मल्टीपल प्रिंटर, एक मिनी लॅमिनेटर, एकाच इसमाचे वेगवेगळया नावांनी तयार केलेली आधारकार्ड, पॅनकार्ड, रेशनकार्ड, बॅंक स्टेमेंट, सॉलव्हनसी, विविध कंपन्यांची ओळखपत्रे इत्यादी बनावट कागदपत्रे हस्तगत केली आहेत. वरील ताब्यात घेतलेल्या आरोपींतांविरुध्द गुन्हा क्र. ३६/२०२४ (मानखुर्द पोलीस ठाणे, मुंबई गुन्हा क्रमांक. १२५/२०२४), कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७३, ४७४, ४७५, ४७६, १२०(ब) भादंविसं अन्वये दाखल करण्यात आला असून पुढील तपास मुंबई गुन्हे शाखा, कक्ष ६ करीत आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. लखमी गौतम , मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, मा. पोलीस उपायुक्त (प्रकटीकरण-१), श्री. विशाल ठाकूर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी-पूर्व), श्री. चंद्रकांत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र साळुंखे, पो.नि. पवार, पो.नि. ननावरे, स.पो.नि. गावडे, पो.उप नि. मुठे, पो.उप नि. रहाणे, म.पो.उप नि. माशेरे, पो.उप.नि. बेळणेकर, पोउपनि. सावंत, पोउपनि.सकपाळ, पोउपनि. आव्हाड, स.फौ.कुरडे, स.फौ देसाई, पो.ह.पारकर, पो.ह.तुपे, पो.ह.वानखेडे, पो.ह.शिंदे, पो.ह.गायकवाड, पो.ह.मोरे, पो.शि.घेरडे, पो.शि. माळवेकर, पो.शि.कोळेकर, म.पो.शि.अभंग, पो.शि.पवार, म.पो.शि.सुतार, पो.ह.चा.डाळे, आणि पो.शि. चा. पाटील यांचे पथकाने पार पाडली आहे.

-००० -